पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१०/०५/२०१७** वेळ - दुपारी **१२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पहिली सभा (विशेष सभा) गुरुवार दिनांक **१०/०५/२०१८** रोजी दुपारी **१२.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.श्री.मिलीन्द शंभरकर, (भा.प्र.से.)** आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
२. मा.शैलेश ऊर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.संजय बबन नेवाळे

या शिवाय मा.कापडणीस – सहा. आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.जगताप – प्रशा.अधिकारी, (क्रीडा), मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे** – सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे **सभापती** पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या **सभापती** पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.**

**मा.नगरसचिव -** मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे **सभापती** पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती **सभापती** पदाकरीता मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे छाननी करणे कामी सुपुर्त करण्यात येत आहे.

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **सभापती**, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती पदाकरीता एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | **मा.संजय बबन नेवाळे** | **मा.शैलेश ऊर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे** | **मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत** |

मा.सभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती या पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून सदर नामनिर्देशनपत्र परिपूर्ण आहे. त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे तसेच नामनिर्देशन पत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन पत्रावर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आहे आणि समितीच्या दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली आहे. सबब सदरचे नामनिर्देशनपत्र वैध असून स्विकृत करण्यात येत आहे.

त्यामध्ये मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणारे **मा.संजय बबन नेवाळे** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

- **नामनिर्देशनपत्र माघारी घेणे** -

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी नियमात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा ( दुपारी १२.३५ ते १२.५० वा.) कालावधी देणेत येत आहे.

**- उमेदवार निवडून आल्याची घोषणा –**

नामनिर्देशनपत्र माघारी घेण्याचा कालावधी संपला. या कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी मागे घेतलेली नाही. सबब मा.सभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती पदाची निवडणूक लढविणारे **मा.संजय बबन नेवाळे** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

यास्तव **मा.संजय बबन नेवाळे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे मी मिलीन्द शंभरकर, पिठासीन प्राधिकारी, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती (विशेष सभा) जाहीर करतो.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक – १

दिनांक - १०/०५/२०१८ विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती **सभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणारे **मा.संजय बबन नेवाळे** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.संजय बबन नेवाळे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

**सही/-**
**(मिलीन्द शंभरकर, भा.प्र.से.)**
पिठासीन प्राधिकारी तथा
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे
क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
(विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

----------

(नवनिर्वाचित सभापती **मा. संजय बबन नेवाळे** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

मा.नगरसचिव - विषय क्र.२ - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती उपसभापतीची नेमणूक करणे.

( मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नाही.)

----------

ठराव क्रमांक - ०२ विषय क्रमांक - ०२
दिनांक - १०/०५/२०१८ विभाग – नगरसचिव
सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.सुजाता पालांडे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या **उपसभापती** पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या **उपसभापतीची** नेमणूक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३
दिनांक - १०/०५/२०१८ विभाग – नगरसचिव
सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.सुजाता पालांडे

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या शुक्रवारी दुपारी ३.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी/सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संजय बबन नेवाळे)**
**सभापती**
क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२६५/२०१८
दिनांक : १०/०५/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.